सोमवार दि.२८ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ५४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड **लोकनेता**

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

## निवडणुकीनंतर फडणवीस अन् ठाकरे एकत्र येणार?

# रामदास आठवले यांचा दावा, जागा न मिळाल्याने व्यक्त केली नाराजी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणुकीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट होऊ शकते, असा दावा केंद्रीय मंत्री आणि रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी केला आहे. महायुतीच्या जागावाटपात मित्र पक्ष असलेल्या रिपाइं पक्षाच्या वाट्याला जागा न आल्याने रामदास आठवले नाराज झाले आहेत. त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली. यासोबतच आठवले यांनी उद्धव ठाकरे यांना महायुतीसोबत येण्याची ऑफरही दिली आहे. रामदास आठवले म्हणाले की, 'मी आणि माझ्या पक्षातील अनेक कार्यकर्ते नाराज आहेत, आमचा पक्ष छोटा जरी असला तरी जागा हव्या होत्या. मागे फडणवीसांना पत्र लिहून किमान ५ जागा देण्याची मागणी केली होती. मात्र, जागा मिळाल्या नाहीत. त्यामुळे उमदेवारी अर्ज दाखल करण्यासाठी जाणार नसल्याचे कार्यकर्ते म्हणत आहेत.रामदास आठवले म्हणाले की, २०१२ मध्ये भाजपसोबत आलो. आज आरपीआय कुठेच दिसत नाही. मी त्यांच्याकडे नाराजी व्यक्त केली आहे. धारावी किंवा चेंबूरच्या जागेसाठी आम्ही आग्रही होतो. महामंडळाची देखील मागणी केली आहे. जिल्हा परिषद, महापालिकेसंदर्भात देखील चर्चा झाली आहे. आरपीआयला डावलून चालणार नाही. आम्हाला सत्तेत वाटा मिळाला पाहिजे. मी महायुतीच्या बाजूने आहे. मी केंद्रात मंत्री असल्याने इतर राज्यात देखील पक्षाच्या जागा वाढवतो, त्यामुळे आम्हाला जागा मिळाल्या पाहिजेत, असे आठवले म्हणाले.

रामदास आठवले यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला. काँग्रेस पक्ष उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मजबूत करण्याऐवजी खिळाखिळा करत आहे, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी महायुतीकडे परत यावे, अशी ऑफर ठाकरेंना दिली. उद्धव ठाकरे हे महायुती सोबत राहिले असते तर एकनाथ शिंदे फुटलेच नसते, असा दावा त्यांनी केला. देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांची भेट निवडणुकीनंतर होऊ शकते, असेही आठवले यांनी म्हटले आहे.



## पंचदिनी अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

बाबासाहेब देवस्थान चिंचाळा व संत वामनभाऊ महाराज यांच्या कृपाआशिर्वादाने हनुमंतराय यांच्या दरबारात चिंचाळा येथे पंचदिनी अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि.२५.१०.२०२४ पासून प्रारंभ झाला आहे कलश पुजा : ह.भ.प.नामधारक आसाराम महाराज (केळसांगवी) यांच्या हस्ते झाली तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मानवाला सुख समाधान व शक्ती मिळावी व त्यांचे जीवन सुखी व्हावे ही संतांची धारणा आहे अशा थोर महात्म्यांचे विचार तळागाळातील भाविक भक्तांनी ऐकावयास मिळावे म्हणूनच या ज्ञान सोहळ्यामध्ये थोर संतांना आमंत्रित करीत आहोत तरी या ज्ञानदानाचा व सुख सोहळ्याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त चिंचाळा ग्रामस्थ व कार्यकारी मंडळ यांनी केले आहे.सहभागी गांवे श्री.क्षेत्र चिंचाळा पंचक्रोशातील गावे देसुर, शेकापुर, बीडसांगवी, बेलगाव,शिदेवाडी, राघापुर, आष्टी, मांडवा,सायकड वस्ती आष्टी ,या सप्ताहात नामवंत किर्तनकार ह.भ.प.ना.आसाराम महाराज (केळसांगवी) यांचे दि.२५.१०.२०२४ रोजी व ह.भ.प.भागचंद झांजे (घाटा पिंपरी) यांचे २६.१०.२०२४ रोजी किर्तन संपन्न झाले तर आज दि. २७.१०.२०२४ रोजी ह.भ.प.रामगिरी महाराज (येळेश्वर संस्थान,येळी) , दि.२८.१०.२०२४ रोजी ह.भ.प. माऊली महाराज कोठुळे (भिवंडी) यांचे किर्तन होणार आहे व मंगळवार दि.२९.१०.२०२४ रोजी ह.भ.प. रघुनाथ महाराज धामणगांवकर यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल.

## सगर दीपोत्सव व दिपोत्सव दिवाळी अंकाचे शानदार प्रकाशन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । प्रतिनिधी**



नाशिक येथील सगर रत्न परिवाराची सगर साहित्य निर्मिती साहेबराव नंदन संपादीत सगर दीपोत्सव दिवाळी अंक व ज्ञानसिंधू प्रकाशन निर्मित तान्हाजी खोडे संपादीत दीपोत्सव २०२४ या अंकाचे मालेगाव येथील बालाजी लॉन्स मध्ये महाराष्ट्र राज्याचे व नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री मा. दादासो. श्री दादाजी भूसेसाहेब यांच्या शुभहस्ते शानदार सोहळ्यात प्रकाशन थाटात संपन्न झाले. ज्ञान विज्ञान अध्यात्म यांचा त्रिवेणी संगम म्हणंजे दोन्ही दिवाळी अंक. साहेबराव तात्या नंदन गावखेड्यातले साहित्यिक संपादक व तान्हाजी खोडे शहरी संपादक.मात्र दोघांची विचारधारा एक नसली तरी दोघांची मत आणि मन मात्र जुळलेले दिसते. अशा शब्दात ना. भूसे यांनी कौतूकास्पद उद्गार काढले. गावकूसाच्या शेती मातीतून साहित्याची निर्मिती म्हणंजे शिंपल्यातील मोतीच म्हटले पाहिजे. अशा शब्दात शिवाजी भोर यांनी कौतुकाची थाप देत दोन्ही संपादकांचे अभिनंदन केले. या प्रसंगी राजकीय सामाजिक शैक्षणिक साहित्यिक क्षेत्रातले अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यात प्रामुख्याने मा. शिवाजी भोर उपाध्यक्ष शिवसेना नाशिक जिल्हा शिंदे गट, जोगेंद्र कवाडे गटाचे प्रांतिक अध्यक्ष मा. गणेशभाई उन्हवणे , मा. नगरसेवक ड शशीभाई उन्हवणे, दाभाडी येथील भाजपाचे जेष्ठ नेते श्री सुभाष नहीरे, कार्यकारी संपादक प्रा. डी. टी. पाटील, आर. जे. पाटील, अंकाचे संचालक आर. के. पाटील, ज्ञानेश्वर खैरनार, हितचिंतक कन्हैयालाल चौधरी व विविध क्षेत्रातले मान्यवर उपस्थित होते. साहजिकच शेवटी दोन्ही संपादकांनी मनोमन आभर व्यक्त केले.

## आज अजित पवार यांचा उमेदवारी अर्ज होणार दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा उमेदवारी अर्ज उद्या सोमवार दि. २८ ऑक्टोबर रोजी दाखल केला जाणार आहे. तत्पूर्वी सकाळी ९ वाजता बारामती शहरातील कसबा येथून भव्य रॅली काढली जाणार असून दुपारी २ वाजता कन्हेरी येथे प्रचाराचा शुभारंभ केला जाणार आहे. बारामती विधानसभा मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे निवडणूक लढवत आहेत. उद्या सोमवारी दि. २८ ऑक्टोबर रोजी ते आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

### दरबार ए शायरी

लोकांचे सरकार किंतु
जनता ही बिनघोर आहे !
जो मालक तो याचक आणि
दाता येथे चोर आहे !!

डॉ.विजयकुमार कस्तुरे,
ॲडव्होकेट, चिखली.

### चारोळी

अंधाऱ्या झोपडीतही
एक दिवा ज्ञानाचा पेटावा
हात माणूसकीचा करावा पुढे
त्याचाही कोपरा थोडातरी नटावा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## रमेश थोरात यांचा आज तर राहुल कुल यांचा उद्या उमेदवारी अर्ज दाखल होणार

### तुतारी चिंन्ह कोणाला मिळणार याची उत्सुकता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विधानसभेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले असून,दौंड तालुक्यात मात्र राजकीय परिस्थिती अतिशय वेगळी पाहायला मिळत आहे. माजी आमदार रमेश थोरात यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश मिळणार आणि रमेश थोरात हे तुतारी चिन्ह घेऊन विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जाणार,अशी चर्चा गेली दोन महिन्यापासून दौंड तालुक्यात चालू असून या प्रवेशाला आणि तुतारी चिन्हाला मुहूर्त आज पर्यंत मिळाला नाही. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाचा एबी फॉर्म माजी आमदार रमेश थोरात यांनाच मिळणार अशी गोपनीय माहिती सूत्रांनी दिली आहे.

याच अनुषंगाने माजी आमदार रमेश थोरात यांनी (दि.२६) सोमवारी खुटबाव या ठिकाणी सायंकाळी ६ वाजता कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी खुटबाव येथे कार्यकर्त्यांनी प्रचंड मोठी गर्दी केली होती.आणि रमेश आप्पा तुम्ही फक्त फॉर्म भरा अशी एकच घोषणा कार्यकर्ते करत होते.माजी आमदार रमेश थोरात हे शरदचंद्र पवार यांना भेटण्यासाठी मुंबईला गेले होते.त्यांनी कार्यकर्त्यांना मोबाईल लाऊड स्पीकर समोर धरून जमलेल्या कार्यकर्त्यांना आपण सोमवारी (दि.२८) उमेदवारी अर्ज दाखल करणार असून मोठ्या ताकतीने उपस्थित राहण्याचे आवाहन देखील केले.




दौंड तालुक्यातील माजी आमदार रमेश थोरात आणि आमदार राहुल कुल यांच्यात राजकीय वैर विळ्या भोपळ्यासारखे असून सध्या विधानसभेच्या निवडणूकीत माजी आमदार रमेश थोरात यांच्या भूमिकेकडे संपूर्ण तालुक्यातील जनतेचे लक्ष लागून राहिले आहे.माजी आमदार रमेश थोरात यांना तुतारी चिन्ह मिळणार किंवा नाही यामुळे सध्या दौंड तालुक्यातील राजकीय वातावरण गोधळलेले पाहायला मिळत आहे.आमदार राहुल कुल आणि रमेश थोरात यांच्यात अटीतटीची लढत होणार असून २०१९ ला अवघ्या ७४३ मतांनी निसटता पराभव झाल्याने हा पराभव माजी आमदार रमेश थोरात यांच्या कार्यकर्त्यांना काही रुचला नव्हता,आता मागील पराभवाचा वाचपा काढण्यासाठी माजी आमदार रमेश थोरात यांचे कार्यकर्ते उघड बोलत नसले तरी सुप्त पद्धतीने तयारीला लागले आहेत.हि वस्तुस्थिती आहे.

आणि याउलट आमदार राहुल कुल यांचे कार्यकर्ते तिसऱ्यांदा हॅट्रिक करण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहेत.दौंड तालुक्यातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता दौंड तालुक्यात तिरंगी-चौरंगी लढत होणार अशी चर्चा आहे.आणि दौंड पंचायत समितीचे माजी सभापती अप्पासाहेब पवार काय भूमिका घेणार हेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. यातच शरदचंद्र पवार पक्षातील नामदेव ताकवणे, राजाभाऊ तांबे असे अनेक उमेदवार रिंगणात उतरणार अशी देखील जोरदार चर्चा आहे.आणि शरदचंद्र पवार पक्षाची तुतारी कोणाला मिळणार याकडे दौंड तालुक्याचे संपूर्ण लक्ष लागून राहिले असले तरी येत्या दोनच दिवसात संपूर्ण चित्र पष्ट होणार हे मात्र नक्की. आणि आमदार राहुल कुल यांच्या कमळाच्या चिन्हाचे विरोधात तुतारी कोण फुंकणार हे देखील येत्या दोनच दिवसात स्पष्ट .

## वै.दत्तात्रय भाऊराव बदने पुण्यस्मरण दिनानिमित्त भावार्थ रामायण व कीर्तनाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड- ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान)महाविद्यालय,वसंतनगर ता.मुखेड जी.नांदेड येथील प्रा.डॉ.रामकृष्ण बदने यांचे वडील वै.दत्तात्रय भाऊराव बदने यांच्या सातव्या पुण्यस्मरण दिना निमित्त दि.२८ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत भावार्थरामायण व दुपारी १.०० ते ३.०० या वेळेत महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार ह.भ.प. पंढरीनाथ महाराज मुरकुटे,नांदेड यांचे हरी किर्तन मौजे देवकरा ता.अहमदपूर जि.लातूर येथे आयोजित केले आहे. यापूर्वी या पुण्यस्मरण दिनानिमित्त ह.भ.प.अर्जुनजी लाड गुरुजी, ह.भ.प.हरिहर महाराज दिवेगांवकर,ह.भ.प. व्यंकट महाराज दगडवाडीकर,ह. भ.प. बंडोपंत महाराज ढाकणे,ह.भ.प.प्रभाकर महाराज झोलकर, ह.भ.प.कृष्णदास महाराज सताळकर, ह.भ.प. वासुदेव शास्त्री मुंडे, ह.भ.प. विठ्ठल महाराज दिवेगांवकर, ह.भ.प. माऊली महाराज खडकवाडीकर यांची कीर्तन झाली आहेत.वै.दत्तात्रय भाऊराव बदने हे निष्ठावंत वारकरी होते. त्यांचे देहावसान रमा एकादशीच्या दिवशी झाले असल्यामुळे हा पुण्यस्मरण दिन त्या दिवशीच संपन्न केला जातो.कीर्तनानंतर एकादशीनिमित्त सर्वांसाठी फराळाची व्यवस्था ही करण्यात आली आहे. तेंव्हा वरील कार्यक्रमास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक प्रा.डॉ.रामकृष्ण बदने, भागवत बदने,प्रा.योगीराज बदने यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांची नांदेड विमान तळावर लोककल्याणकारी शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी असंख्य भारतीय जनता पार्टीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

संपादकीय

# समाधानाचा स्पर्श



लोकनेता न्यूज नेटवर्क

'आनंदाचे डोही आनंद तरंग' या अभंगातून मनाच्या स्थितीचे वर्णन संत तुकाराम महाराज म्हणतात. ते सांगतात, माझे मन हे जणू काही आनंदाचा डोहच झाले आहे. आनंदाच्या अनेक प्रकारच्या लाटा त्यावर तरंगत असतात. माणसाचं मन ही फार मोठी दैवी देणगी ईश्वराने मानवाला दिली आहे.

शोधलं तर ते निश्चितपणे सापडतं, हे जीवनातील सूत्र मी लक्षात ठेवलं आहे. १७ मार्च १९७६ ला माझं लग्न झाल्यानंतर मी काय करू, हा मोठा प्रश्न मी घरातच लहान मुलांचं बालमंदिर चालवून सोडविला. मी या लहान लहान गोळ्यांना घडविण्यात आनंद शोधत गेले. या बालमंदिरातील बालगोपालांच्या चेहऱ्यावरील निरागस भाव, त्यातील आनंदाची अनुभूती मी मिळवत गेले. त्यांच्या बोबड्या बोलण्यातला प्रार्थनेचा आनंद, त्यांच्यातील एकमेकांशी भांडण्याचा आनंद मी त्यांच्या बरोबरीने घेत त्यांना घडवत गेले.

स्वतःभोवती असलेलं सुंदर जग करण्यासाठी आधी स्वतःमध्ये आनंदी असे जग तयार करणे जसे गरजेचे असते, दुसऱ्यांना हसवत हसवत स्वतःमध्ये खूश राहणे गरजेचे असते. अनेक वादळे व वेडीवाकडी वळणे ही मनातल्या मनात ठेवून आनंदी चेहरा झळकावणं गरजेचं असतं. दुःखाच्या विचारात पडून खंत करण्यापेक्षा आनंद कसा मिळेल, याचे कारण शोधायचे असते. कारण 'शोधलं तर ते निश्चितपणे सापडतं' हे साधं सरळ सूत्र आहे. ते स्वीकारलं तर आनंदाचा शोध घेणं सोपं होतं.

जीवनातला खरा आनंद कशात आहे, तुमच्यासाठी आनंदाचे स्त्रोत कोणते, तुम्हाला कोणती गोष्ट सर्वांत आनंदी बनविते, कोण तुम्हाला आनंदी बनविते, हे शोधायला हवे. आनंद चराचरात भरलेला आहे. झाडे लावताना, त्यांच्याशी संवाद साधतांना, सुगंधी फुलांकडे, त्यांच्या रंगांकडे, त्यांच्या सुंदर आकारांकडे त्यांची अभूतपूर्व रचना बघताना आनंद मिळतो. शीतल चंद्राकडे एकटक बघताना, काही वेळ पावसात भिजताना, मनसोक्त जेवण करून पोटोबाला शांत करताना, गच्चीत कुंड्या व त्यातील छोट्या रोपट्यांना पाहाताना, त्यांच्यावर मनसोक्त विहार करणाऱ्या फुलपाखरांना बघताना, आईवडिलांची सेवा करताना, सासरी रमलेल्या मुलींशी संवाद साधताना, प्रवास करताना, सहप्रवाशासी संवाद साधताना मी आनंद शोधते.

आपलं घर स्वच्छ ठेवणे, घरातील कामे करणे, यातून मला वेळेचा सदुपयोग केल्याचाही आनंद मिळतो. मला सूर्योदय पाहायलाही आवडते. कारण सूर्योदय हा जीवनातील नैराश्यरूपी दुखण्याला बाजूला ठेवत नवचैतन्याची, नवीन सुरुवात याची अनुभूती देत असतो. माझे पती दरवर्षी वाढदिवसाच्या दिवशी कोणताही डामडौल न करता अनाथ व निराधार मुलांच्या आधारश्रमाला मदत करण्याचा आनंद घेतात. त्यांच्या या आनंदातच माझाही आनंद असतो. जुन्या हिंदी चित्रपटातील लोकप्रिय गाणी, मराठी भावगीतं ऐकण्याचाही आनंद मी घेते. आनंदाचे अनेक प्रकार वाचण्यात आले. खरा आनंद, आत्मिक आनंद, अनोखा आनंद आणि वेगळा आनंद या सर्वांचा मी शोध घेत असते.मला जीवनाचं मूल्य समजलं ते राजेश खन्नाच्या 'आनंद' या चित्रपटातील नायकाच्या भूमिकेत. समोर साक्षात मृत्यू दिसत असतानाही हा नायक स्वतःबरोबरच सगळ्यांना हसवत असतो. शेवटी 'जिंदगी कैसी है पहेली' सोडवत असतो. कसल्याही फारशा अपेक्षा न ठेवता जगणं म्हणजेच आनंद लुटणे, अशी साधीभोळी व्याख्या जीवनातील आनंदाविषयी केली आहे, बस्स..

# सुक्ष्मवृतीने अक्षर शोघण्याची कला यांच्याच ठायी

लोकनेता न्यूज नेटवर्क

दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'जागतिक अंध दिन' किंवा 'पांढरी काठी सुरक्षा दिन' म्हणून साजरा केला जातो, हा एक जागतिक कार्यक्रम आहे ज्याचा उद्देश अंधत्व आणि दृष्टीदोषाकडे लक्ष वेधण्यासाठी आहे. तुम्ही रस्ता ओलांडताना, चालताना संपूर्ण पांढर्या रंगाची किंवा वरून दोन तृतींयांश पांढरा आणि खाली एक तृतीयांश लाल रंग असलेली काठी घेऊन चालणारे अनेक लोक पाहिले असतील. हे सर्व लोक देसी डोळे परी निर्मिसी त्यापुढे अंधार अशी निसर्गाची अजब निर्मिती असलेले अर्थात अंध असतात. या दिवशी नॅब (नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड) या संस्थेच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. ऑक्टोबरचा दुसरा गुरुवार हा जागतिक दृष्टी दिन आहे, आपले डोळे आणि दृष्टी सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्याची, दृष्टीदोष आणि अंधत्वाबद्दल जागरुकता वाढवण्याची आणि नेत्र आणि दृष्टी काळजीला प्रोत्साहन देण्याची संधी. २००० पासून जागतिक दृष्टी दिन साजरा केला जात आहे आणि आता जागतिक आरोग्य संघटनेच्या बरोबरीने अंधत्व प्रतिबंधक आंतरराष्ट्रीय एजन्सीद्वारे समन्वयित केले जात आहे. हे सुरुवातीला लायन्स क्लब इंटरनॅशनल फाऊंडेशनच्या साइटफर्स्ट मोहिमेचा भाग म्हणून पाळण्यात आले. या दिवशी नेत्र तपासणी किंवा तुमच्या डोळ्यांची काळजी घेण्याचे वचन द्या आणि इतरांना तसे करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी सोशल मीडियावर शेअर करा. या जागतिक दृष्टी दिनाचे आंतरराष्ट्रीय अंधत्व प्रतिबंधक संस्था (आयएपीबी) चे उद्दिष्ट १० दशलक्ष डोळ्यांच्या चाचण्यांपर्यंत पोहोचणे हे आहे आणि नेत्र निगा सेवांसाठी जागरुकता निर्माण करण्याचे वचन दिले आहे. या वर्षी २०२४ मधील जागतिक आरोग्य दिनाची थीम 'माय हेल्थ, माय राइट' अशी आहे आणि आम्ही अधिक सहमत होऊ शकलो नाही. आरोग्य सेवा मिळणे हा मूलभूत मानवी हक्क आहे. चढउतार, दगडधोंडे, खाचखळगे, कुत्रे, मांजर असे प्राणी, बसलेली-झोपलेली माणसे असे काठीच्या परीक्षेत्रात येणारे सगळेच अडथळे पांढर्या काठीचा उपयोग करून पार करता येतात. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पहिल्या महायुद्धानंतर डॉ. रिचर्ड व्हुव्हर यांनी सर्वप्रथम अंधांना चालण्या-फिरण्यासाठी सोयीची पडेल अशी विशिष्ठ स्वरूपाची काठी तयार केली. ती काठी हुव्हर केन म्हणून ओळखली गेली. १९२१ मध्ये ब्रिस्टलचे फोटोग्राफर जेम्स विंग यांना अपघातात अंधत्व आले. तेव्हा गडद रंगांच्या काठय़ा घेऊन फिरताना वाहनचालक आणि इतर डोळस व्यक्तींना दुरून ती ओळखणे कठीण जात होते. हे लक्षात आल्यानंतर अंधारातही सहजपणे दिसेल, असा पांढरा रंग आपल्या काठीला दिला. डोळा असूनही नसल्यासारखा असतो. पांढरी काठी आम्हांस जणू आमचा डोळाच. कुणाचयाही आधाराशिवाय मुक्तपणे संचार करण्यासाठीचा आत्मविश्वास. ही



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

पांढरी काठी म्हणजे अंधाची आजची जीवन संजीवनी व जीवनसाथी आहे. जागतिक पांढरी काठी दिनानिमित्त लोकांनी अंधांना रस्ता ओलांडताना मदत करणे, साहित्य पुरवून यामध्ये जनजागृती करावी. यामध्ये लोकसहभाग खूप आवश्यक आहे. अंधासाठी पांढरीकाठी म्हणजे त्यांच्या करिता जीवनरेखाच आहे. तुम्हा-आम्हाला डोळे आहेत, चांगली दृष्टी आहे. त्याद्वारे आपण साऱ्या सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेऊ शकतो. मनमुराद आनंद लुटू शकतो. पण ज्यांना डोळे नाहीत, दृष्टी नाही, त्यांचा कधी आपण विचार केला आहे का? तात्पर्य म्हणजे त्यांचा देखील आपण सामाजिक कर्तव्यबुद्धीने विचार करायला हवा. कारण तेही समाजाचे अविभाज्य घटक आहेत. दृष्टिहीन लोकांना आपल्या सारखंच जग न्याहाळता यावं आणि त्यांनाही डोळसपणे जीवनदर्शन करता यावं व त्यांना एक नवी जीवनदृष्टी मिळावी, या दृष्टिकोनातून आपण सर्वजण 'नेत्रदान' करण्याचा संकल्प करू या.

दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक अंध दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. पांढरी काठी घेऊन रस्त्यावर चालणारी व्यक्ती ही अंध आहे याचं सामाजिक भान ठेवून त्याला मदतीचा हात देणं, हा एक कर्तव्याचा भाग आहे, हे लक्षात ठेवावे. जागतिक पातळीवर दृष्टिहीन लोकांची संख्या पाहता, त्यातील २० टक्के लोक एकट्या भारतात आहेत. अशा गंभीर जागतिक प्रश्नावर रामबाण उपाय म्हणजे प्रत्येक सुजाण नागरिकाने नेत्रदान करण्यास स्वयंस्फुर्तीने पुढे येणं व ही काळाची गरज देखील आहे. जगात सुमारे १८० दशलक्ष लोक दृष्टिहीन असून, त्यातील जवळ जवळ ३५ दशलक्ष लोक भारतात आहेत. जगातील सुमारे ९० टक्के अंध हे विकसनशील देशांमध्ये राहणारे आहेत. वार्धक्य, बदलती जीवनशैली, गरिबी, निरक्षरता, मानवी विकासाचा अभाव, सामाजिक मागासलेपणा, अत्याधुनिक वैद्यकीय साधन सामुग्रीची कमतरता या प्रमुख गोष्टी अंधत्वाच्या वाढत्या प्रमाणाला कारणीभूत आहेत, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्वेक्षणात नमूद केलं आहे. जागतिक पातळीवर 'अंधत्व' या समस्येवर मात करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय अंधत्व प्रतिबंधक संस्था (आयएपीबी) आणि जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्युएचओ) यांनी संयुक्तपणे '२०२० व्हीजन' हा कार्यक्रम राबवून, प्रत्येकाला 'दृष्टीचा अधिकार' ही संकल्पना साकार करण्यात पुढाकार घेतला आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी भारतासह ४० देशांनी योगदान देण्याची तयारी दर्शविली, ही उल्लेखनीय बाब आहे. खरं तर, भारताच्या खालोखाल दक्षिण आफ्रिका व चीन या देशद्वयामध्येही अंधत्वाची समस्या लक्षणीय आहे. वैश्विक स्तरावर जनजागृती करून अंधत्वाच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी प्रभावी व ठोस उपाययोजना केल्या जात आहेत. जगातील लहानमोठ्या सर्वच देशांनी वैश्विक कर्तव्य या नात्याने या मोहिमेला यशस्वी करण्यात कटिबद्ध व्हावे, हे अपेक्षित आहे. प्रत्येक नेत्रहीन व्यक्तीला राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्याच्या मनातील अंध म्हणून न्युनगंडाची भावना घालविण्यासाठी प्रत्येकाने सामाजिक बांधिलकीच्या नात्याने प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य सरकारनेही नेत्रचिकित्सा व कॅटरॅक्टसवर अद्ययावत उपचारपद्धती या बाबींवर भरीव आर्थिक तरतूद करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना नवी दृष्टी देण्यासाठी ठोस पावलं उचलावीत. शासनयंत्रणेने अंधत्व मिटविण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास अंधत्व निर्मूलन अभियान मोठ्या प्रमाणात यशस्वी होऊ शकते, असे जागतिक आरोग्य संघटनेचे मत आहे.

अंधांसाठी प्रत्येकाने सहानुभूतीपेक्षा स्वानुभूतीची भूमिका अवलंबिली पाहिजे. स्वत:चे डोळे पट्टीने बांधून काही वेळ जगायची अनुभूती घ्यावी, म्हणजे त्यातील गांभीर्य कळून येईल. अंध, अपंग, मतिमंद वा मूकबधिरांना गुणदोषांसह स्वीकारून त्यांना आपलसं करणं यातच मानवी जीवनाची सार्थकता आहे. अंधांना सामाजिक जाणिवेतून रस्ता ओलांडताना मदत करणे, रेल्वे-बसमध्ये बसण्यास आपली जागा देणे, त्यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधणे, जीवनाशी निगडीत विभिन्न विषयांवर त्यांच्याशी गप्पा मारणे, त्यांचे मनोबल वाढविणे या गोष्टी आपण दैनंदिन जीवनात वावरताना करायला पाहिजेत. इतकेच नव्हे तर, एक पाऊल पुढे टाकून एखाद्या अंध व्यक्तीशी डोळस व्यक्तीचा विवाह करून देऊन त्याचे अंधकारमय जीवन प्रकाशमय करणं हे पुण्यकर्म आपण आपल्या जीवनात करू शकतो. आजच्या घडीला अंधत्वाची समस्या मिटविण्यासाठी नेत्रदान ही मोहीम लोक चळवळ होणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण मानव म्हणून जीवंतपणी अनेकप्रकारे पुण्यकर्म करीत असतो, हे कौतुकास्पद आहे. तथापि, मृत्यूनंतरही नेत्रदान करून आपण आणखी एका पुण्यकर्मात भर टाकू शकतो. म्हणून ही संधी दवडू नका, यासाठी नेत्रदानाकरिता आधीच इच्छापत्र भरून द्या, जेणेकरून आपल्या मृत्यूनंतर आपली नेत्रं दुसऱ्या अंधव्यक्तीला दान देऊन त्याला नवीन दृष्टी देता येईल. चला तर, नेत्रदान करून अंधत्वाची समस्या मिटविण्यास वचनबद्ध होऊ या. नियतीने डोळ्यातल्या प्रकाश ज्योती हिरावून घेत ज्या अंध बांधवांचे आयुष्य अंधकारमय करून टाकले आहे, त्यांच्या जीवनात यंदाची दिवाळी आशेचा किरण आणेल अशी आपण सर्व प्रार्थना करू या!

# उद्योगाचे घरी देवता

लोकनेता न्यूज नेटवर्क

'लोकसत्ता' सातत्याने कारखानदारीचे (मॅन्युफॅक्चरिंग) महत्त्व अधोरेखित करीत आला आहे. सेवा क्षेत्र कितीही वाढले, नवउद्यामींचा कितीही गुणाकार झाला, सेन्सेक्स अगदी गगनास जरी भिडला तरी कारखानदारीचे मोल या कशास नाही. हे सर्व घटक हे अर्थव्यवस्थेस पूरक. न्याहारी ज्याप्रमाणे चौरस भोजनास पर्याय ठरू शकत नाही तद्वत या सर्व क्षेत्रांची वाढ कारखानदारीची जागा घेऊ शकत नाही. तथापि या सत्याकडे अलीकडे दुर्लक्ष करण्याचा नवाच 'उद्योग' अनेक जण करताना दिसतात. त्यात सत्ताधारी मग्न असल्यास ते एक वेळ समजून घेता येईल. कारण त्या बिचाऱ्यांसाठी 'जे बरे, ते खरे' असे वास्तव असते. तेव्हा कारखानदारीपेक्षा हा वर्ग नवनव्या उगवत्या क्षेत्रांचे गुणगान करणार यात नवल नाही. परंतु अर्थव्यवस्थेचे अभ्यासकही कारखानदारीपेक्षा सेवादी क्षेत्रांच्या घोडदौडीचे कौतुक करण्यात रममाण दिसतात. ही स्वत:ची फसवणूक. नुकत्याच जाहीर झालेल्या 'इंडेक्स ऑफ इंडस्ट्रियल प्रॉडक्शन'मुळे (आयआयपी) ही फसवणूक चव्हाट्यावर येते. हा निर्देशांक औद्योगिक उत्पादनाचा माग ठेवतो. कारखानदारीच्या कोणत्या क्षेत्राने कशी कामगिरी केली, कोण मागे आहे, कोण पुढे इत्यादी तपशील या निर्देशांकावरून लक्षात येतो. त्यात देशातील समग्र कारखानदारीचे प्रतिबिंब पडत असल्यामुळे खरे तर सेन्सेक्सपेक्षाही अधिक महत्त्व या 'आयआयपी'स असायला हवे. पण वास्तव तसे नाही. केवळ भांडवली बाजाराचा निर्देशांक असलेला सेन्सेक्स हा अधिक माध्यमस्नेही असल्याने आणि त्यात अनेकांचे हितसंबंध असल्याने त्यास अधिक महत्त्व दिले जाते. परिणामी आयआयपी दुर्लक्षित राहतो. नुकताच प्रसृत झालेला ऑगस्ट २०२४चा 'आयआयपी' मात्र अर्थव्यवस्थेस खडबडून जाग आणत असून त्याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. याचे कारण गेल्या तब्बल २२ महिन्यांतील नीचांकी कामगिरी हा आयआयपी नोंदवतो. गेल्या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात कारखानदारीच्या या निर्देशांकाने त्याआधीच्या वर्षीपेक्षा तब्बल १०.९ टक्के इतकी वाढ नोंदवलेली होती. म्हणजे गतसाली या काळात कारखाने मोठ्या जोमाने काम करत होते. त्या तुलनेत यंदा मात्र हा निर्देशांक उणे ०.१ टक्के इतका नोंदवला गेला. म्हणजे वाढ सोडा; प्रत्यक्षात या कालखंडात देशात कारखानदारी आटली. सुमारे दोन वर्षांनंतर, म्हणजे ऑगस्ट '२२ नंतर, पहिल्यांदाच हा निर्देशांक इतका घसरला. त्या वर्षी या निर्देशांकातील घट ४.१ टक्के होती. आणि आता या वर्षी उणे. हे वास्तव धक्कादायक असून हे असे कसे झाले, याची चर्चा सुरू झाली आहे. सरकारच्या मते ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी झाल्याने हा



निर्देशांक आटला. सरकारचे हे विनोदी विश्लेषण दोन घटकांच्या आधारे आहे. या काळात खचलेले खाणकाम आणि घटलेली वीज निर्मिती यामुळे या निर्देशांकावर परिणाम झाला, असा खुलासा सरकारतर्फे करण्यात आला. या महिन्यात खाण उद्योग साधारण चार टक्क्यांनी आकसला आणि वीज निर्मिती साडेतीन टक्क्यांनी कमी झाली. त्यामुळे हा निर्देशांक गडगडला, असे सरकारचे म्हणणे. त्यात तथ्य नाही असे नाही. पण ते अर्धे आहे. म्हणजे सरकारचे म्हणणे अर्ध-तथ्य ठरते. याचे कारण या काळात प्रत्यक्ष कारखानदारीही आकसली. त्यास पावसाचे कारण कसे लावणार? अतिवृष्टी झाली म्हणून कारखाने बंद पडत नाहीत की त्यामुळे औद्योगिक वापरावर परिणाम होत नाही. मोटारी तयार होत असतात, त्यांच्या सुट्या भागांची निर्मिती सुरू असते, सर्व औद्योगिक उत्पादनेही निर्माण होत असतात. तेव्हा पाऊस हे काही हा निर्देशांक घटीचे मुख्य कारण नव्हे. गतवर्षीच्या तुलनेत या काळात प्रत्यक्ष कारखानदारी जेमतेम एक टक्क्याने वाढली. केवळ वाढलेले पर्जन्यमान हेच जर हा निर्देशांक घसरण्याचे कारण असेल तर मग त्याआधी मार्च ते जुलै- म्हणजे पाऊस जोर धरायच्या आधीच्या- महिन्यांत या निर्देशांकाची कामगिरी नेत्रदीपक हवी. तसे झालेले नाही. यंदाच्या मार्च महिन्यापासूनच हा निर्देशांक घसरणीस लागलेला आहे असे उपलब्ध आकडेवारीवरून सहज ध्यानी येईल. या एप्रिलला सुरू झालेल्या आर्थिक वर्षाच्या पाचपैकी चार महिन्यांत हा निर्देशांक आकसला. एवढेच नाही तर गतवर्षीच्या एप्रिल-ऑगस्ट या काळात ६.२ टक्के इतका असलेला हा निर्देशांक यंदा मात्र ४.२ टक्के इतकाच नोंदला गेला. याचा अर्थ उघड आहे. केवळ अतिवृष्टी हे कारण यामागे असू शकत नाही. असे ठामपणे म्हणता येते याचे कारण २०१६ पासून या निर्देशांकाने इतकी घसरण पाहिलेली नाही. म्हणजे गेल्या आठ वर्षांत कधी अतिवृष्टी झालेली नाही, असे नाही. म्हणजेच यातून आकसत चाललेली कारखानदारी दिसून येते. उद्योगांच्या राष्ट्रीय स्तरावरील पाहणीत दिसून आल्यानुसार आपल्याकडे कारखाने म्हटले की त्यात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचाच भरणा सर्वाधिक दिसून येतो. रोजगार निर्मिती आदींच्या अनुषंगाने या घटकाचे महत्त्व कोणीही अमान्य करणार नाही. पण तरीही हे क्षेत्र हे काही बड्या कारखान्यांस पर्याय असू शकत नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर पिंपरी-चिंचवड परिसराचे देता येईल. टाटा मोटर्सचा एक भव्य कारखाना त्या परिसरात आला आणि शेकड्याने लघु, सूक्ष्म उद्योग तेथे उभे राहिले. मोटारींचे सुटे भाग, त्यात वापरले जाणारे रबर/ प्लास्टिक आदींच्या वस्तू यांची निर्मिती लघु उद्योगांकडे गेली. म्हणजे भव्य कारखान्याच्या सावलीत अनेक लघु उद्योग वाढीस लागतात. त्यांची गरज निर्माण होते. म्हणून भव्य कारखानदारी महत्त्वाची. तथापि आपल्याकडील चित्र असे की आपल्या एकूण कारखानदारींतील ९६ टक्के इतका प्रचंड वाटा हा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा आहे. यातही तब्बल ९९ टक्के 'कारखाने' असे आहेत की ज्यातील कर्मचाऱ्यांची संख्या १० वा त्यापेक्षाही कमी आहे. हजार/ दोन हजार कर्मचाऱ्यांना सामावून घेणारे कारखाने अगदी नगण्यच दिसून येतात. थोडक्यात भव्य कारखानदारी तशी आपल्याकडे कमीच. जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या वगैरे अर्थव्यवस्थेत हे असे का असावे? त्याच्या अनेक कारणांपैकी एक कारण आहे डोळ्यात येण्याची भीती. काहीही भव्य-दिव्य उभे राहते आहे असे दिसल्यावर त्या परिसरातील राजकीय 'ग्रामदेवता' वा त्यांचे अनुयायी त्याभोवती घिरट्या घालू लागतात. जेवढी गुंतवणूक मोठी, तितकी या ग्रामदैवतांची मागणी मोठी आणि तितकी त्या प्रमाणात त्यांना 'शांत' करण्याची किंमत अधिक. हे टाळण्यासाठी बरेच कारखानदार आपली उत्पादन आस्थापना अनेक लहान, लहान केंद्रांतून विभागतात. हे असे केल्याने ग्रामदेवता वक्री होण्याचे प्रमाण कमी होते हे खरे; पण त्यामुळे कारखान्यांच्या उत्पादन क्षमता आणि वाढीवरही परिणाम होतो. तसेच असे केल्याने कामगार संघटना आणि त्याबाबतची आव्हाने सांभाळणेही सोपे जाते. आपल्याकडे कामगार कायद्यांतील सुधारणा पुरत्या न झाल्याने आणि ज्या झाल्या त्यांची अंमलबजावणी पूर्ण ताकदीने होत नसल्याने गुंतवणूकदार मोठ्या गुंतवणुकीआधी दहा वेळा विचार करतात.या सगळ्याचा परिणाम आपल्या औद्योगिक विकासावर मोठ्या प्रमाणावर होत असून मंदावलेला औद्योगिक निर्देशांक हे त्याचे एक लक्षण. या लक्षणाकडे वेळीच लक्ष द्यायला हवे. मोठ्या कारखानदारीस, गुंतवणुकीस पर्याय नाही हे वास्तव पुन:पुन्हा लक्षात घ्यायला हवे. ''उद्योगाचे घरी देवता लक्ष्मी वास करी'' हे केवळ गाणे घोकून चालणारे नाही. ते वास्तवात यायला हवे.

# आ.राजेश पवार यांना विकासाची व्याख्याच कळली नाही ;डॉ.माधव विभुते यांचा घणाघात







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

मी विकास केलो म्हणून आ. राजेश पवार हे सतत बॅनरबाजी जाहिरात करतात पण नाली रस्ते किंवा तीर्थयात्रा केले तर हा मूलभूत विकास नव्हे तर ग्रामीण भागात शैक्षणिक स्वच्छ पाणी आणि प्रत्येकाच्या हाती लहान मोठे उद्योग करणे हे लोकप्रतिनिधीच्या हातात असते मला निवडून द्या विकासाची गंगा प्रत्येक गावात आनीन ,विकास कसा राहतो हे दाखवून देईन आमदार राजेश पवार यांना अजूनही विकासाची व्याख्याच कळली नाही असा घनाघात वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉक्टर माधव विभुते यांनी मौजे शेळगाव छत्री येथील बैठकीत केला.

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉक्टर माधव संभाजीराव विभूते यांच्या प्रचारार्थ तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथील आयोजित करणार बैठकीच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ चांगुनाबाई अशोक बैलकवाड तर उमेदवार डॉक्टर माधव विभुते यासह बालाजी पाटील गोमासे, संजय पाटील बेलदारकर,करुणाताई खंडेलोटे, संजय पाटील चोंडे, विठ्ठल पाटील आणेराय, रामचंद्र पाटील सालेगाये माजी सरपंच जळबा वाघमारे चेअरमन माधव शहापुरे व्हाईस चेअरमन माधवराव सालेगाये,पोलीस पाटील प्रतिनिधी सतीश आणेराये ,ज्येष्ठ नागरिक पुंडलिक पाटील आणेराये यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉक्टर विभूते बोलताना पुढे म्हणाले की, मी राजेश पवार यांना आमदार करण्यासाठी भरीव मदत केली माझ्यासह अनेकांनी केली पण हे बेईमान झाले गावातील सरपंच यांना विकासाची कामे देण्यापेक्षा गुत्तेदारामार्फत केली, नायगावचे चव्हाण घराणे आणि गोरठेकर घराणे हे स्वच्छ राजकारण समाजकारण केले पण आमदार राजेश पवार यांनी आमदारकीच्या नावाखाली आपली गुत्तेदारी केली माझा पेशा रुग्णाची सेवा करणारा डॉक्टर होतो माझी त्यांनी नोकरी घालून माझ्यावर अन्याय केला मी अश्रूत बुडालो होतो ज्या खुर्चीमुळे माझ्यासह अनेकांवर अन्याय झाला ती खुर्चीच आता फेकून द्यायची असा देखील घनाघात डॉक्टर माधव विभुते यांनी केल्यानंतर मतदारातून टाळ्यांचा पाऊस पडला, प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी जळबा पाटील शहापुरे, बळीराम पाटील आणेराये,
हाजीराव पाटील आणेराये, सुनील जैयवंतराव पाटील आणेराये,धोंडीबा वाघमारे प्रकाश बैलकवाड,भारत बैलकवाड, भास्कर पाटील आणेराये सुनील वाघमारे, गजानन पाटील धम्मे, माधव ऐन्जपवाड, दिलीप निलावार, राजाराम ऐन्जपवाड, सतीश निलावार, गंगाधर कुंभार यासह महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विजय आणेराये यांनी मानले.

# लोणीच्या महादेव मंदिरात शेकडो वर्षा पासून काकड आरती



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

लोणी ता. आंबेगाव येथील महादेवाचे मंदिरामध्ये काकड आरतीचे मोठ्या प्रमाणामध्ये आयोजन केले जाते. काकड आरती मध्ये महिला व पुरुष मोठ्या संख्येने हरी नामाचा गजर करतात. वारकरी संप्रदायामध्ये भजन, किर्तन, प्रवचन, गाथा पारायण, हरिपाठ, आषाढी कार्तिकी वारी सोहळा, ज्या ज्या ठिकाणी संतांचे जन्म झाले अथवा ज्या ठिकाणी त्यांनी समाधी घेतल्या त्या त्या ठिकाणांना विशेष असे महत्त्व आहे.अशा सर्व क्षेत्रांना तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झालेला आहे. लाखोंनी भाविक त्या तीर्थक्षेत्री विशिष्ट तिथीला लाखोंनी जनसमुदाय जमतो. त्या तीर्थक्षेत्री जाणे व तेथे हरी नामाचा जप करणे हे पुण्य कर्म समजले जाते. पापाचा क्षय व्हावा व पुण्या मध्ये वृद्धी व्हावी याकरिता वारकरी संप्रदायाने काही नियम व अटी केलेल्या आहेत, गळ्यामध्ये तुळशीची माळ, कपाळी आष्टी गंध, भगवी पताका धारण केलेला वारकरी ही महाराष्ट्राची खरी ओळख आहे. ही ओळख भारता पुरती मर्यादित नसून तिचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण जगामध्ये झालेला आहे.हे चित्र आपल्याला पंढरपूरच्या वारीमध्ये पाहायला मिळते. कोजागिरी पौर्णिमेपासून सुरुवात होणारा काकडा भजन पुढील एक महिना महाराष्ट्र मधील सर्व गावांमधील मंदिरांमध्ये पाहावयास मिळते. पहाटे चार ला सुरू होणारा काकडा भजन सकाळी सहा वाजेपर्यंत राहते. याची सांगता काकड आरतीने होते. काही गावांमध्ये काकडा संपल्यानंतर अन्नप्रसादाचेही दान केले जाते. लोणी गावामध्ये महादेवाचे मंदिरामध्ये काकडा भजनाचे आयोजन केले जाते. या मंदिरामध्ये निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई यांनी पैठण वरून येताना विसावा घेतला होता अशी पौराणिक वंदेता आहे त्यामुळे हे ठिकाण या परिसरामधील अत्यंत पवित्र असे ठिकाण मानले जाते महाशिवरात्रीला या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह होतो. गेल्या दोन वर्षांपूर्वी ५० वे वर्ष पूर्ण केल्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये नाम सप्ताह झाला होता. या सप्ताहाला आजूबाजूचे परिसरांमधून मोठ्या प्रमाणात भाविक येत होते. आता ये काकडा भजन करता मोठ्या प्रमाणामध्ये भाविक या ठिकाणी उपस्थित असतात. काकडा भजन नंतर अन्नदानाचाही कार्यक्रम केला जातो. भाविक स्वखुशीने आपली पंगत देतात. ह. भ. प. बबन महाराज सिनलकर यांचे मार्गदर्शनाखाली गेली पन्नास वर्ष हा नामयज्ञ सोहळा अखंडपणे चालू आहे. ज्यामध्ये कधीही खंड पडत नाही त्याला अखंड असे म्हणतात. राम कृष्ण हरी

# पाच वर्षे काडीचेही काम न करणाऱ्या विद्यमान लोकप्रतिनिधी कडून माझ्या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न-शिवाजीराव कर्डिले

## भाजपचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांचा राहुरी तालुक्यात प्रचार दौरा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघात आमदार असताना विकासाची गंगोत्री आणण्यात यश आले होते. सिंचनापासून अनेक प्रश्नांची सोडवणूक केली. सत्तेत असलो नसलो तरी विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला नाही. दुर्देवाने मागील पाच वर्षांत मतदारसंघात काडीचेही काम झाले नाही. विकासकामांना खीळ बसली. मी आमदार असताना केलेल्या विकासकामांचे श्रेय घेण्याचे काम करीत विद्यमान लोकप्रतिनिधी केवळ नारळ फोडत बसले. भावनिक मुद्दयांवर त्यांना एकदा यश आले मात्र आता जनतेच्या भावना बदलल्या असून यावेळी मतदारसंघात परिवर्तन अटळ आहेत. महायुती सरकारच्या कामगिरीवर जनता खूष असून त्याचे प्रत्यंतर निकालात दिसेल असे प्रतिपादन राहुरी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे उमेदवार माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी केले.

राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघातून भाजपची उमेदवारी जाहीर होताच माजी मंत्री कर्डिले यांनी मतदारसंघात प्रचाराला वेग दिला आहे. त्यांनी राहुरी तालुक्यातील डिग्रस, मुळानगर, वरवंडी, बाभुळगाव, धामोरी बुद्रुक, धामोरी खुर्द, खडांबे बुद्रुक, खडांबे खुर्द, वांबोरी स्टेशन, सडे, वाघाचा आखाडा, राहुरी स्टेशन, गावठाण तांदूळवाडी, कोंढवड, शिलेगाव, करपेवाडी, केदळ बुद्रुक, केंद्र खुर्द, चंडकापूर, पिंप्री वळण, वळण, मानोरी, आडगाव या गावांना भेटी देत मतदारांशी संवाद साधला. प्रत्येक गावांत मतदारांनी प्रचंड उत्साहात ढोल ताशाच्या गजरात कर्डिले यांचे स्वागत केले. मतदारांशी संवाद साधताना कर्डिले यांनी मतदारसंघाची झालेली दुर्दशा बदलण्याची ग्वाही देत यंदा परिवर्तनासाठी साथ देण्याचे आवाहन केले.

कर्डिले म्हणाले, संपूर्ण देशाचा विकास केल्यामुळे नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान झाले आहेत. केंद्र व राज्यात एका विचाराचे सरकार असल्याने सर्वसामान्यांना लाभ होत आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज, कृषी सन्मान योजना, लाडकी बहिण योजना, विद्यार्थीनींना मोफत उच्च शिक्षण, दुधाला प्रतिलिटर ७ रूपये अनुदान असे अनेक कल्याणकारी निर्णय घेतल्याने जनतेच्या मनात महायुतीबद्दल आपुलकीची भावना आहे. प्रचारा दरम्यान मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद परिवर्तनाची नांदी ठरत आहे.
या प्रचार दौऱ्यावेळीसुरेश बानकर, शरद पेरणे, लिलाबाई तनपुरे, विश्वास तनपुरे, लक्ष्मण तनपुरे, तानाजी धुमाळ, विनीत धुमाळ, उत्तम म्हसे, कडू आप्पा म्हसे, रविंद्र म्हसे, कुंडलिक खिलारी, सुभाष गायकवाड, गोरक्षनाथ तारडे, नाना मानगुडे, विजया मानगुडे, सुरेश गायकवाड,लक्ष्मण आढाव, अनिल आढाव, जालिंदर आढाव, गोविंद आढाव,सुभाष आढाव, राजेंद्र आढाव उपस्थित होते.
गावागावात कर्डिले यांचे स्वागत करताना विविध पदाधिकारी, कार्यकर्ते अतिशय उत्साहात होते. शिवाजीराव कर्डिले हे जनतेच्या सुखदु:खात सहभागी होतात. त्यांच्याशी थेट संपर्क साधता येतो. अहमदनगर जिल्हा बँक थेट शेतकऱ्यांच्या दारात नेण्याचे काम त्यांनी केले. दूध धंदा वाढावा, शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे पडावेत यासाठी त्यांनी गायी म्हशी खरेदीसाठी सहज कर्ज उपलब्ध करून दिले. राज्यात आगामी काळात पुन्हा महायुतीचे सरकार येणार आहे. राहुरी मतदारसंघातील जनता कर्डिले यांनाच आमदार करणार असून आगामी सरकारमध्ये दुग्धविकास मंत्री बनून त्यांनी शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम करावे, असे आवाहन वक्त्यांनी यावेळी केले.

## ज्ञानस्त्रोत केंद्रामध्ये मतमोजणी व स्ट्राँग रूमची निर्मिती

# नांदेड लोकसभा व विधानसभांची मतमोजणी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**





नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापाठीच्या ज्ञान स्त्रोत केंद्र इमारतीमध्ये लोकसभा पोटनिवडणूक व सहा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होणार आहे. याठिकाणी लोकसभेसाठी ६ व विधानसभेसाठी ६ अशा १२ मतमोजणी केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच स्ट्राँग रूमची निर्मिती करण्यात आली आहे. लोहा, हदगाव, किनवट या तीन विधानसभा क्षेत्राची मतमोजणी त्या-त्या ठिकाणी होणार आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक एकाच वेळेस येत असल्यामुळे यावेळी जिल्ह्यातील सहा विधानसभा क्षेत्राची मतमोजणी देखील नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठात होणार आहे. अन्यवेळी नांदेड दक्षिण व नांदेड उत्तर अशीच विधानसभेची मतमोजणी शहरात होत होती. मात्र यावेळी दोन्ही निवडणुका सोबत असल्यामुळे भोकर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, नायगाव, देगलूर, मुखेड या लोकसभा क्षेत्रातील विधानसभेची मतमोजणी देखील विद्यापिठामध्ये होणार आहे. यासाठी १२ स्ट्राँग रूम तयार करण्यात आल्या आहेत. यामध्ये लोकसभेतील ६ मतदारसंघातील मतपेट्या तसेच ६ विधानसभा क्षेत्रातील मतपेट्या ठेवण्यात येणार आहेत. २० नोव्हेंबरला मतदान व २३ नोव्हेंबरला मतमोजणी असल्यामुळे केवळ २० रोजीच्या रात्री पर्यंत पोलिंग पार्टी नांदेडला पोहचतील. २१ व २२ रोजी मतपेट्या स्ट्राँग रूममध्ये असेल. २३ नोव्हेंबरच्या पहाटे निवडणूक विभागाच्या निर्देशानुसार स्ट्राँग रूममधून मतपेटीतून उमेदवारांच्या उपस्थितीत ईव्हिएम बाहेर काढल्या जातील. त्यानंतर मतमोजणी होईल. त्यामुळे विद्यापिठाच्या उपलब्ध पायाभूत सुविधांमध्ये काही अंशिक बदल करण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रामकृष्ण गलधर, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता विजय पुसदकर, तहसिलदार संजय वारकड, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, सहायक अभियंता सावन कासलीवाल आदी अधिकारी यासंदर्भात कार्यरत आहेत. आज जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांच्यासह ललीतकुमार वऱ्हाडे, डॉ सचिन खल्लाळ आदींनी या केंद्रांची पाहणी केली. जिल्ह्यातील लोहा, हदगाव, किनवट या मतदारसंघातील मतमोजणी त्या-त्या ठिकाणी होणार आहे. लोहा विधानसभेसाठी महसूल हॉल तहसिल कार्यालय लोहा येथे तर हदगाव विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी समाज कल्याण भवन येथे अनुसूचित जाती मुलींचे शासकीय वसतिगृह तामसा रोड हदगाव येथे होणार आहे. किनवट विधानसभेसाठी येथील आयटीआय कॉलेज येथे मतमोजणी होणार आहे.

# श्रीगोंद्यात नागवडेंनच्या विरुद्ध घनश्याम शेलारांची तोफ कडाडली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**







श्रीगोंदा विधानसभेचे राजकीय वातावरण दिवसेंदिवस चांगलेच गरम होत आहे काँग्रेस चे नेते घनश्याम शेलार व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राहुल जगताप या दोन्ही दिग्गज नेत्यांना आघाडीत आयत्या वेळेस आयाराम झालेल्या नागवडे यांची उमेदवारी निश्चित मांण्य नाही त्यामुळे राहुल जगताप यांनी अपक्ष उमेदवारी फायनल लढण्याची तयारी केली आहे या वेळी बोलताना घनश्याम शेलार म्हणाले की जर आघाडीच्या नेत्यांनी मला किंवा राहुल जगताप यांना किंवा साजन पाचपुते यांना तिघांपैकी एकाला उमेदवारी दिली असती तर निश्चितच आघाडीचा उमेदवार विजयी झाला असता परंतु दुर्दैवाने तालुक्यावर बळच लाधलेल्या उमेदवाराचे मात्र डिपॉजीत जप्त होणार आहे यावेळी नागवडे यांनी पाचपुते यांच्या वर केलेल्या टिकेचा घनश्याम शेलार यांनी नागवडे यांचा चांगलाच समाचार घेतला पाचपुते यांनी ३५ वर्षे काहिच विकास केला नाही असं नागवडे म्हणतात तर मागच्या विधानसभा निवडणुकीत आपण पाचपुते यांना पाठिंबा देण्यासाठी तत्परता का दाखवली होती आणि आज मतदारांना सांगताय पाचपुते यांनी ३५ वर्षे कसलाच विकास केला नाही यावेळी बोलताना शेलार पुढे म्हणाले की नागवडे हे सहकारी साखर कारखान्यात गेली कित्येक वर्षे काम करत आहेत आपण काय दिवे लावले हे संपूर्ण तालुक्यातील जनतेला चांगलेच माहीत आहे अनुराधा नागवडे यांनी जिल्हा परिषद सदस्य असताना तालुक्यातील जनतेसाठी काय काम केलं त्यांनी मतदारांना सांगाव आपलं तालुक्याच्या विकासासाठी काय योगदान आहे हे नागवडे यांनी सांगाव स्वस्वार्था साठी चार महिन्यांत दोन पक्ष बदलणारे आपण तालुक्याचा काय विकास करणार आमच्या सर्वांच्या विच्यारांचा जो उमेदवार असेल तोच श्रीगोंद्याचा आमदार असेल असा ठाम विश्वास शेलार यांनी व्यक्त केला या वेळी सांगलीच्या पुढचा श्रीगोंदा पॅटर्न असेल असेही शेलार म्हणाले एकंदरीत पाहता शेलार व जगताप हे नेते एकत्र येऊन लढणार आहेत अनुराधा नागवडेंन विरुध्द राहुल जगताप विरुद्ध भाजपच्या उमेदवार डॉ प्रतिभा पाचपुते वंचित बहुजन आघाडी चे उमेदवार आण्णासाहेब शेलार असी चौरंगी लढत होणार आहे.

## मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या कडे
# शिवश्री सुरेश घोरबांड गुरूजी यांनी मागीतली उमेदवारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**




लोहा कंधार विधानसभेच्या निवडणूकीचे मतदान येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार असून लोहा तालुक्यातील कलंबर खुर्द येथील शिवश्री सुरेश घोरबांड गुरूजी यांनी मराठा योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या कडे कंधार लोहा विधानसभेची उमेदवारी मागितली असून जरांगे पाटील यांनी तयारीला लागा उमेदवारी आपलीच असून मी दिलेल्या कोणत्याही माणसाला जनता मदत करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.असे आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सुरेश घोरबांड गुरूजी यांनी सांगितले आहे.सुरेश गुरुजी यांचे मराठवाडा स्तरावर कला, साहित्य, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक विविध कार्यात सक्रिय सहभाग असून ते श्री संत योगीराज निवृत्ती महाराज यांची पोथी लिहिणारे घोरबांड महाराज यांचे ते नातू असून त्यांनी श्री संत योगीराज निवृत्ती महाराज व श्री संत मोतीराम महाराज यांचे मंदिर उभारले आहे.धार्मीक कार्याबरोबर मराठा समाजातील मुलामुलींचे विवाह जुळवून देण्यासाठी नेहमी कार्य करतात.२००५ या वर्षी मुंबई येथे आझाद मैदानावर मराठा आरक्षणासाठी तीन दिवस उपोषण केले होते.२००७ या वर्षी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी साजरी करण्याची त्यांनी सुरुवात केली होती.त्यांचे सर्व कार्य पाहून मराठा योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांनी उमेदवारी देण्याचे आश्वासन दिले असून मी कंधार लोहा विधानसभेची निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी सांगितले.त्यांनी लाठ खुर्द,पांगरा, कलंबर खुर्द, भोपाळवाडी येथील शिष्टमंडळ घेऊन जरांगे पाटील यांची भेट घेतली असल्याचे सांगितले.

# हजारो कार्यकर्त्यांसमोर महेंद्रशेठ घरत यांनी दिला जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण । प्रतिनिधी**



२० नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्रात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत रायगड जिल्ह्यातील सात विधानसभेपैकी महाविकास आघाडीतर्फे काँग्रेस पक्षाला एकही उमेदवार न दिल्यामुळे रायगड जिल्ह्यामधील काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी नाराज झाले आहेत.सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांनी रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांना भेटून आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी आग्रह केला. रविवार दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ रोजी हजारो कार्यकर्ते महेंद्रशेठ घरत यांना भेटण्यासाठी शेलघर येथे आले असता उपस्थित हजारो कार्यकर्त्यासोबत महेंद्रशेठ घरत यांनी संवाद साधला व आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी आपली भूमिका स्पष्ट करत असताना महेंद्रशेठ घरत म्हणाले की खरेतर लोकसभेची निवडणूक मावळ लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेस पक्षाला पोषक होता परंतु उद्धव ठाकरे सेनेने आपला उमेदवार उभा केला व कोकणातील एकही सीट काँग्रेस पक्षाला मिळाली नाही. पुढील विधानसभेत काँग्रेस पक्षाला न्याय मिळेल असा आशावाद होता परंतु याही विधानसभेत रायगड जिल्ह्यात एकही विधानसभा मतदारसंघ काँग्रेस पक्षाला न सुटल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. काँग्रेस कार्यकर्ते आम्ही कोणत्याही पक्षाचे ओझे उचलणार नाही असे म्हणणे होते. जोपर्यंत महाराष्ट्र प्रदेशचे नेते आदेश देत नाही तोपर्यंत आपण कोणत्याही पक्षाचे काम करायचे नाही असे ते म्हणाले.तसेच बॅरिस्टर ए.आर.अंतुले साहेबांच्या रायगड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला एकही विधानसभा मतदारसंघ न देता भोपळा मिळाला त्यामुळे महेंद्रशेठ घरत यांनी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रदेश चिटणीस तथा रायगड सहप्रभारी श्री. श्रीरंग बरगे यांच्यासमोर रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष पदाचा राजीनामा सादर केला.जनतेच्या संवाद सभेसाठी रायगड जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उरण मतदार संघात काँग्रेस पक्षाच्या मदतीशिवाय कोणताही उमेदवार निवडून येऊ शकत नाही ही काळ्या दगडावरची रेष असल्याचे काँग्रेस कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे उरण विधानसभेत काँग्रेस पक्ष किंगमेकर असेल.

# संतोष उत्तरवार यांचा सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

नांदेड जिल्ह्यातील बिलोली येथील रहिवासी असलेले मा संतोष उत्तरवार यांचे आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समितीच्या वतीने अमरावती दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सत्कार करण्यात आला

आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समिती, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मा संतोष उत्तरवार हे सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेले आहेत तसेच मोर्चे, आंदोलन यांसारख्या लढ्यात ते सुरुवाती पासून सक्रीय होते मंत्रालया समोरील सामूहिक आत्मदहन, आंदोलनात ते नेहमी सहभागी होते. त्यामुळे कार्याची दखल घेऊन आमदार मदनभाऊंच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला . यावेळी मा.आमदार तथा भावी मंत्री आ. मदनभाऊ येरावार, संघर्ष समितीचे अध्यक्ष सन्माननीय नंदकुमारजी लाभसेटवार, आर्य वैश्य समाज यवतमाळ चे अध्यक्ष सन्मानिय श्री विजय भाऊ पालतेवार, संघर्ष समितीचे पदाधिकारी श्री गजानन भाऊ, सुधिर भाऊ, समिर भाऊ, बेलगमवार सर, संतोषजी उत्तरवार, वैभवजी कोडगीरवार, जयाताई लाभसेटवार, आदी मान्यवर उपस्थित होते .

# महायुतीच्या उमेदवार डॉ.प्रतिभाआक्का पाचपुते विधानसभेच्या रिंगणात

## पाचपुते यांचा उमेदवारी अर्ज आज दाखल होणार

लोकनेता न्यूज नेटवर्क । श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले



महायुतीचे सर्व प्रमुख पदाधिकारी व नेते यांच्या समवेत चर्चा केल्यानंतर उमेदवार म्हणून उद्या सोमवार दि.२८ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ११.३० वाजेनंतर २२६ – श्रीगोंदा – नगर या मतदारसंघातून आपण अर्ज भरण्याचा निर्णय घेतला आहे. अतिशय साध्या पद्धतीने कुठलेही शक्ती प्रदर्शन न करता मतदार संघातील सामान्य व्यक्तींच्या हस्ते व महायुतीचे प्रमुख पदाधिकारी यांच्या हस्ते व उपस्थितीत आपण फॉर्म भरून ही प्रक्रिया पूर्ण करणार आहोत.तरी महायुतीच्या कार्यकर्ते, पदाधिकारी व नेते या सर्वांनी नोंद घ्यावी व उपस्थित रहावे असे आवाहन आमदार बबनरावजी पाचपुते यांनी केले आहे...!

# महाविर फायबर जिनिंग येथे कापुस खरेदीस प्रारंभ



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

आतुकुर रोड वरील महाविर फायबर प्रायव्हेट लिमिटेड येथे रविवारी कापुस खरेदीस प्रारंभ करण्यात आले असल्याची माहिती महाविर फायबर जिनिंग चे व्यस्थापक बाबुराव पाटील यांनी उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना दिली.महावीर फायबर्स प्रायव्हेट लिमिटेड चे मालक अजय जैन,सुभाष जैन यांच्या हस्ते विधीवत पूजासंपन्न झाली. बिलोली चे शेतकरी दत्ता रांकटवार या शेतकऱ्यांचा कापसाला खरेदी करून प्रारंभ करण्यात आला. पहिल्याच दिवशी कापसाला ७०११ रुपये भाव व ५०० किव्टंल ची आवक झाली आसल्याची माहिती व्यसथापक बाबुराव पाटील यांनी उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. यावेळी साईनाथ आप्पा रोशनगाव , दिलीप सेठ कमिनवार , सत्यम सेठ उत्तरवार , आनंदराव शिंदे पाटील , बापूराव पाटील बाबलीकर , जी राज रेड्डी राम रेड्डी समस्त शेतकरी व व्यापारी उपस्थीत होते.

# आमदार किशोर जोरगेवारांनी कमळ घेतले हाती:पक्ष प्रवेशाला विरोध करणाऱ्या मुनगंटीवारांच्या उपस्थितीत केला भाजपात प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नागपूर (वृत्तसंस्था)**

भाजप, शिवसेना, काँग्रेस व अपक्ष असा राजकीय प्रवास करीत अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांना शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पक्ष प्रवेश नाकारल्यानंतर रविवारी भाजपात प्रवेश केला. जोरगेवार यांच्या भाजप प्रवेशाला कालपर्यंत तीव्र विरोध करणारे भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे वन व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार व माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा मागासवगीर्य आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार जोरगेवार यांचा भाजप प्रवेश येथील हॉटेल ए. डी. मध्ये पार पडला. यावेळी आमदार जोरगेवार यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले.

यावेळी महिला काँग्रेसच्या माजी अध्यक्ष नम्रता आचार्य यांनी प्रवेश घेतला. या दोघांच्या भाजप प्रवेशाने भाजपची शक्ती या जिल्ह्यात वाढली आहे असे या प्रवेशाच्या वेळी मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, या विधानसभा निवडणुकीत भाजपला व महायुतीला यश मिळेल असा विश्वास मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील ५ मतदारसंघातील उमेदवार पक्षाने जाहीर केले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील ६ व गडचिरोली जिल्ह्यातील ३ अशा एकूण ९ जागा भाजप व महायुती जिंकणार असल्याचा दावा मुनगंटीवार यांनी केला. जाहीरनामा व वाचननाम्यात चंद्रपूर जिल्ह्याला झुकते माप राहिल असे मुनगंटीवार यांनी सांगितले. कार्यकर्ते विधानसभा निवडणुकीत पूर्णशक्तीने काम करतील असे मुनगंटीवार यांनी सांगितले. दिल्ली येथे पक्षाचे प्रामाणिक कार्यकर्ते ब्रिजभूषण पाझारे यांना उमेदवारी मिळावी यासाठी गेलो होतो. जोरगेवार यांना उमेदवारी देऊ नका यासाठी गेलो नव्हतो, असेही मुनगंटीवार म्हणाले. पक्षाचे प्रामाणिक कार्यकर्ते नाराज झाले आहेत, असे सांगण्यात येत असले तरी नाराज व अन्याय झालेल्या कार्यकर्त्यांचे योग्य पुनर्वसन केले जाईल. भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा व राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी तसे आश्वासन दिले आहे. भाजपचा आत्मा हा कार्यकर्ता आहे. कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडणार नाही. प्रत्येकाला न्याय मिळेल, कुणावर अन्याय होणार नाही, अन्यथा कार्यकर्त्याची अवस्था बंद झालेल्या दोन हजारांच्या नोटेसारखी होईल. भाजपमध्ये कार्यकर्ता नाराज होईल. पण पक्षाचा विचार सोडणार नाही. त्यामुळे पाझारे बंडखोरी करून निवडणुकीत उभे राहणार नाही असेही मुनगंटीवार म्हणाले. यावेळी महानगर अध्यक्ष राहुल पावडे, ग्रामीण अध्यक्ष हरीश शर्मा, प्रमोद कडू, डॉ. मंगेश गुलवाडे उपस्थित होते.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904